अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई—३०
दुरध्वनी क्र.— ०२२—२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :— ०३/०४/२०२५

**—: प्रेसनोट :—**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १४/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | संदीप शाहूराज जोगदंडकर, श्रमिक, के/पुर्व विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. १२,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. १२,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचा हातगाडी विक्री व भाडयाने देण्याचा व्यवसाय आहे. दिनांक १८/०१/२०२५ रोजी तक्रारदार यांचे हातगाडी बनविण्याचे सामान रखरखाव विभाग, बी.एम.सी., के/ पुर्व विभाग, मुंबई यांनी उचलून नेले. तक्रारदार यांनी के/पुर्व वार्ड येथे दुसऱ्या दिवशी जाऊन तेथील अधिकारी यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला परंतू त्यांची भेट झाली नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी दिनांक २७/०१/२०२५ रोजी के/पुर्व वार्ड येथील अधिकारी श्री. निशान उर्मटकर यांची भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे सामान आता डम्प केले असून काहीही होवू शकत नाही असे सांगितले. तद्नंतर दिनांक २७/०३/२०२५ रोजी तक्रारदार यांना त्यांचे ओळखीचे लोकांकडून कळाले की, त्यांचे सामान बीएमसी, के/पुर्व विभागाचे असिस्टंट श्री. संदीप हे विकत आहेत. त्यानुसार तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. संदीप यांना भेटण्याकरीता त्यांच्या ओळखीच्या एका व्यक्तीस पाठविले. त्यावेळी लोकसेवक श्री. संदीप यांनी तक्रारदार यांना फोनवर संपर्क करून जे.बी.नगर मेट्रो स्टेशन जवळ भेटण्यास बोलाविले. त्यानुसार तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. संदीप यांची भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे सामानाच्या बदली रू. १५,०००/- लाचेची मागणी केली. तक्रारदार यांनी विनंती केल्यानंतर लोकसेवक श्री. संदीप यांनी तडजोडीअंती तक्रारदार यांचे सामान सोडविण्याकरीता रू. १२,०००/- इतक्या लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०२/०४/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०३/०४/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या कामाकरीता रू. १२,०००/- इतक्या लाचेची मागणी करून स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. १२,०००/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्रीमती अर्चना सुतार, सहाय्यक पोलीस आयुक्त पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. प्रकाश सोनवणे, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :- **लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री** क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :— acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :— acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :— addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :— www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :— www.acbmaharashtra.net